INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# 'गृह—अर्थशास्त्र विषयातूनउद्योगाच्या संधी

**प्रा. डॉ. कु. उषा ना. राखुंडे**
गृह—अर्थशास्त्र (विभाग प्रमुख)
शिवरामजी मोघे महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) जि. यवतमाळ

**सारांश :—**
सद्यास्थितीत नौकऱ्या मिळणे अतिशय कठिण झाले आहे. आज बेकारी, मंदी, देशाची अस्थिरता, वाढती महागाई, वाढत्या गरजा या चक्रव्हूहातून बाहेर पडणे अशक्य झाले आहे म्हणून नव्या पिढीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी पर्यायाने देशाचा विकास साधण्यासाठी योग्य ते शिक्षण, मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. म्हणुनच पुर्वीच्या भारतीय महिलांनी उद्योगात घेतलेली भरारी अभ्यास करुन गृह अर्थशास्त्र व होम सायन्सच्या विद्यर्थिनींना चालना व प्रोत्साहन मिळावा म्हणून ''गृह अर्थशास्त्र विषयातून उद्योगांची संधी'' या विषयावर अभ्यास करण्यात आला व गृह—अर्थशास्त्र विषयातून लघू उद्योगाची घरबसल्या छोटे लघुउद्योग निर्माण करुन ते मोठ्या उद्योगापर्यंत नेता येतो यावर प्रकाश टाकण्यात आला.

**प्रस्तावना :—**

सद्यास्थितीत नोकऱ्या मिळणे अतिशय कठिण होउन बसले आहे. त्यात शासकीय नोकऱ्या मिळणे तर दुरापास्तच. खाजगी कंपन्यांमध्ये सुद्धा नोकरी कपात केली आहे. त्यामुळे शैक्षणीक पात्रता असुनही मनासारखी नौकरी मिळत नाही. आजच्या स्थितीत जागा एक तर अर्ज हजारो असतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय नौकरी करायची म्हणजे अनुभव हवाच पण हा अनुभव आणायचा कोठुन? नौकरी मिळण्यासाठी विशिष्ट कोर्सेस करावे लागतात. तरीपण नौकरी मिळत नाही. अशावेळी तरुणपणातील उमेदीची वर्षे निघून जातात.

आज बेकारी, मंदी, देशाची अस्थिरता व वाढती महागाई, वाढत्या गरजा या चक्रव्यूहातून बाहेर पडणे अशक्य झाले आहे. नव्या पिढीला स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी तसेच स्वत:चा पर्यायाने देशाचा विकास साधण्यासाठी योग्य ते शिक्षण, मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि अर्थसहाय्य मिळणे आवश्यक आहे. बहुतेक तरुण:तरुणींना व्यवसाय करण्याची इच्छा असते पण त्या अनुषंगाने मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे उद्योग सुरु करतांना अडचणी निर्माण होतात.

आज भारत प्रगतशील देशामध्ये आजची स्त्री छोटे मोठे स्वत:चे उद्योग करु पाहत आहे. राष्ट्राच्या आर्थिक विकासात महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन, संघटन व व्यवसायाशी संबंधीत बाबीमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करित आहे.

आज **''महिला उद्योजकता''** देशाच्या विकासाची गरज आहे. आपण २०१८ मध्ये स्त्री पुरुष समानतेविषयी सहज मत मांडतो काही अपवाद वगळता आजही सामाजीक स्थिती म्हणावी तेवढी बदललेली दिसत नाही विविध क्षेत्रात महिलांचा हक्क वाढतोय ही सुखावह गोष्ट नक्कीच आहे तरीपण आजही काही क्षेत्रात पुरुषी वर्चस्व मोठ्या प्रमाणात आहे. आपल्या देशात खुप मोठ्या प्रमाणात क्षमता असलेले मनुष्यबळ आहे यातील महिलांचा हक्कही तेवढाच मोठा आहे. आपल्यादेशातील महिलांना अनेक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागतोय. आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झालीय. स्वत:च्या पायावर आर्थीक दृष्ट्या उभी राहतेय. उद्योगविश्वात असणाऱ्या स्त्रियांचा संघर्ष अनेक पातळीवर आहे. वैयक्तीक जबाबदाऱ्यांपासून सामाजीक पातळीपर्यंत जागतीक पातळीवर १२६ मिलीयमहून अधिक महिलांनी उद्योग सुरु केलेत. केवळ भारताचा विचार केला तर ८ मिलीयमहुन अधिक महिला उद्योगात सक्रीय आहेत. काही वर्षापुर्वी महिलांचे उद्योग स्वयंरोजगार किंवा गृह उद्योग अशी परिस्थिती आपल्याकडे होती. घर संसार सांभाळून जे करायला जमेल ते करणे यात पारंपारीक स्त्रियांचा मोलाचा वाटा होता.

प्रस्तुत शोध निबंधात पुर्वीची भारतीय स्त्री व तीचे उद्योग आणि गृह अर्थशास्त्र विषयातुन निर्माण होणारे उद्योग यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. व पुढील उद्दिष्टे व गृहीतके ठरविण्यात आले.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :—**

- पुर्वीची भारतीय स्त्रीने उद्योग क्षेत्रात निर्माण केलेल्या उद्योगाचा अभ्यास करणे.
- गृह अर्थशास्त्र व होम सायन्स विषय व्यवसायाभिमुख असून या विषयातुन निर्माण होणाऱ्या उदयोगाची संधी याचा अभ्यास करणे.
- स्त्री उद्योजकास आवश्यक गुणांचा अभ्यास करणे.

**गृहीतके :—**

- पुर्वीची भारतीय स्त्री पिढ्यानं पिढ्या चालत येणारा घरगुती व्यवसाय करुन उदयोग करीत असत
- गृह अर्थशास्त्र हे व्यवसायाभिमुख शास्त्र आहे.व त्यातून गृहउद्योगाच्या संधी प्राप्त होतात.
- स्त्रिला उद्योग वाढविण्यास उत्तम गुणांची आवश्यकता असते.

प्रस्तुत शोध निबंधाच्या उद्दिष्टे गृहीतकानुसार हया विषयावर अभ्यास करण्यासाठी संशोधन पद्धती स्त्रोताचा उपयोग करण्यात आला.

**संशोधन अभ्यासाची पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये दुयम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला.असून त्यात प्रामुख्याने संदर्भग्रंथ, अभ्यासक्रमीक पुस्तके, संशोधन पत्रीका, मासीकेतील अग्रलेख व वर्तमानपत्रातील लेख याचा आधार घेण्यात आला.

**पुर्वीची भारतीय स्त्रीचे उद्योग :—**

काही स्त्रिया जन्मत:च उद्योगीनी असतात. कारण त्यांच्यातील घरातील पिढ्या नं पिढ्या चालणाऱ्या व्यवसायामुळे त्यांना व्यवसायाचे बाळकडू मिळालेले असते. काही महिलांवर उद्योगांची जवाबदारी लादली जात असते. वडील, पती किंवा भावाच्या आजारपणामुळे किंवा अकाली निधनामुळे तर कांही महिला स्वत: प्रयत्नपुर्वक उद्योजगतेचे गुण विकसीत करीत. पतीच्या निधनानंतर खंबीरपणे व धडाडीने त्यांचा व्यवसाय चालविणाऱ्या **शीला साबळे** उद्योगाची माहिती नसतांना कारखाना चालविणाऱ्या **उषा शिंदे** वडीलांचे निधनानंतर कारखान्याचे तीन कारखाने करणाऱ्या **सुजाता सोपारकर** रेडीमेट ब्लाउजचा व्यवसाय करणाऱ्या **श्वेता इनामदार** या स्त्रीयांनी उद्योगात खडतर प्रवास केला.

समाजाची गरज ओळखून निवडुन, चिरुन केलेल्या भाज्यांचे पाकीटे पुरविणारे **लक्ष्मी मोरे,** आफ्रीकी व आखाती देशात दुप्पटा कापड पुरविणारे **रेखा कारखानीस**, रजया तयार करुन निर्यात करणाऱ्या **सॅट आयनी**, फर्निचर क्षेत्रात नाव कमविणाऱ्या **शैलजा सुर्यवंशी** पंचधान्याचे व विविध प्रकारच्या लाडवांचा व्यवसाय करणाऱ्या **सेपा गोखले**.

आरामदायी गादीची निर्मिती करणाऱ्या **डॉ. सुजाता पवार** इत्यादींनी नाविण्यपूर्ण व्यवसाय सुरु करुन कौतुकास्पद यश प्राप्त केले आहे. ब्रेडची हस्तकला विकसीत करणारी **कल्पना जव्हेरी**, आंतरराष्ट्रीय ज्वेलरी डिझाईन स्पर्धेत तीन पारीतोषके मिळविणारी **निता भोसले**, शिल्प केलेतील प्राविण्य मिळविणारी पद्मश्री झालेल्या **माणी नारायण,** स्टॉल डिझाईनचे कौशल्य विकसीत करणारी **क्षमा दलाल**, अवॉर्डचे डिझाईन करणारी **बिजल कलबाग**, डोळे बांधून गणपतीची मुर्ती बनविणारी व लिमका बुक ऑफ रेकॉर्डच्या तीनदा विक्रमाची नोंद झालेली **रमा शाह** सर्व जाहीरातदारांना कुत्रीम पाने, फुले पुरविणारी **सुनीता नागपाल मेनन** इ. कलाकार महिलांनी अत्यंत मेहनतीने स्वत:ची कला खुलवली आहे हे कौतुकास्पद आहे तसेच छोट्या उद्योगांपासून सुरुवात करुन मोठे झालेले अनेक उद्योग आहेत. त्यापैकी लिज्जत पापड १० महिलांनी घरच्या घरी सुरु केलेला उद्योग हळु हळु वाढत जावून आज एक **ब्रांड** तयार झाला आहे आणि मार्केट मध्ये लिज्जत पापड मोठ्या प्रमाणात व्यवसाय करीत आहे.

म्हणुनच आपण म्हणतो मुलगी शिकली प्रगती झाली स्त्रीची आपल्या समाजातील प्रतीमा हळु हळु बदलत मोठ्या प्रमाणात झापाट्याने बदल घडत आहे. स्त्री अतिशय कार्यक्षम धडाडीची झाली.उद्योग क्षेश्रात तीचे अस्तीत्व जाणवत आहे. जास्तीत जास्त स्त्रीया व मुलींचा उद्योग व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाकडे कल वाढतोय ही समाधानकारक नक्कीच बाब आहे.

गृह अर्थशास्त्र विषयातून मुली व स्त्री घरच्याघरी गृहउद्योग सुरु करणे कधीही चांगले. घरच्या सर्व जवाबदाऱ्या सांभाळून उद्योग करता येतात. अनेक उद्योग आपल्याकडे उपलब्ध आहे. स्वत:च्या वेळेनुसार कामही करता येते. व गुतुवणुकही कमी लागते. आणि आवडीतूनच व्यवसायाची निवड केल्यामुळे समाधानही मिळते.**'' गरज ही शोधाची जननी आहे''** असे म्हणतात हे खरे ही आहे. म्हणूनच या गरजेतूनच गृहउद्योग उभे राहतात.

**गृहअर्थशास्त्र विषयातून उद्योग निर्मीती :—**

- विणकाम, भरत काम, शिवणकाम तयार करणे.
- पाळणा घर सुरु करणे, नर्सरी चालविणे,
- टोमॅटो सॉस, सोया सॉस बनविणे
- कांदा बटाटा यावर प्रक्रिया करणे.
- लोकरीच्या वस्तुची निर्मीती करणे
- हस्तकलेच्या वस्तू तयार करणे.
- फुलांचे गुच्छे तयार करणे.
- उद्बत्ती, मेणबत्ती, खडू, पणत्या तयार करणे.
- ब्युटीपार्लर मेहंदी काढण्याचे प्रशिक्षण घेउन ते चालविणे.
- हॉटेल चालविणे , खानावळ तयार करुन डब्बे पुरविणे.
- गृह सजावट करणे.
- टाकाउ वस्तुपासून वस्तु तयार करुन विकणे.
- कागदी बॅग व पाकीटे तयार करणे.
- सॉफ्ट टाईजचा व्यवसाय करणे.
- अन्न पदार्थावर आधारीत प्रक्रिया उद्योग तयार करणे. — पोळी भाजी केंद्राचा व्यवसाय, सणा सुदीचे फराळ व पदार्थ, बेकरी व्यवसाय, रेडीमेट स्नॅक्स चा व्यवसाय, फळांचे रस प्येयाचा व्यवसाय, मसाल्यांचा व्यवसाय करणे.

वरील सर्व उद्योगांचा गृह उद्योग स्तरातून सुरु करता येउन तो उद्योग मोठ्या स्तरावर वाढवीता येतो.

स्वतंत्रपणे जमत नसेल तर काही महिलांनी एकत्र येउन एखादा व्यवसाय सुरु करता येते. बचत गट तयार करुन गृह उद्योग सुरु करायला महिलांसाठी अनेक शासकीय योजना राबविल्या जातात ते माहित असणे आवश्यक आहे.

उद्योग व्यवसायावरील स्त्रीयांचा समभागाला राज्य व केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले जाते.

स्त्रीयांसाठी शासनाने अनेक नाविण्यपूर्ण योजना सुरु केल्या आहेत. ज्याच्या माध्यमातून उद्योजकता विकासास चालना मिळते.

महिला बॅंक आणि महिलांसाठी वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था भांडवल पुढे करण्यासाठी पुढे येत आहे.

महिलांसाठी विशेष अनुदान योजना, कर्ज पुरवठा योजना कर सवलतीच्या दरात योजना राबविल्या जातात.

**यशस्वी उद्योजक होण्यासाठी गुण :—**

- सुप्त गुणांना हेरुन जास्तीत जास्त स्त्रियांनी व्यवसायाकडे वळायला हवे.
- वेळेचे नियोजन व्यवहार, आर्थीक अंदाजपत्रक, संवाद कौशल्य, सामंजस्य असणे
- सचोटी, वेळेचे काटेकोर नियोजन
- कल्पकता व ग्राहक भिमुखता
- अशावादी गुणवत्ता, संकुचीत पणाचा त्याग

- नवनविन संकल्पना वापरुन उद्योगवाढीसाठी प्रयत्नशील राहणे.
- उद्योगप्रक्रियेचा पूर्ण तपशील माहित असणे.
- सरकारी नियम माहित करुन त्यानुसार उद्योग करणे.
- पैशाचा आवक जावकावर बारीक लक्ष ठेवता येणे.
- नफा वा तोटा झाल्यास न डगमगता परिस्थिती हाताळणे.

**निष्कर्ष :—**

- उद्योगामुळे कुटुंबाला आर्थीक मदत करणे व स्वत:चे एक अस्तित्व निर्माण करण्यास मदत होते.
- पुर्वीच्या स्त्रियांनी घेतलेल्या उद्योगाची भावी उद्योग निर्माण करणाऱ्या स्त्रिला चालना मिळते.
- गृह अर्थशास्त्र व्यवसायाभीमुख शिक्षण देणारे शास्त्र आहे व उद्योगाची संधी प्राप्त होण्यास मदत होते.
- स्त्री संघटन करुन एखादा उद्योग तयार केल्यास तो मोठ्या प्रमाणात उद्योग निर्माण करण्यास मदत होते.
- गृहअर्थशास्त्र व होमसायन्स हे विषय **''उद्योगकता निर्माण करणारे शास्त्र आहे''.**
- उद्योजक गुणांच्या आधारावर उद्योगात वाढ करण्यास व उद्योग टिकवुन ठेवण्यास मदत होते.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**

i. प्रा. शैलजा सांगळे — 'महाराष्ट्रातील महिला उद्योग'
ii. डायमंड पब्लीकेशन पुणे
iii. संपादक चंद्रकान भुइटे — 'लघुउद्योगाची संधी'
iv. 'महिला बचत गट मार्गदर्शीका' चौधरी लॉ पब्लीकेशन जळगांव पुणे
v. सविता मेहता — 'महिलांना आर्थीक बळ देणारे गृहउद्योग'
vi. 'वर्तमानपत्रे'

❖❖❖❖